**विभागाच्या नावात रोजगार या शब्दाची भर घालून विभागाचे नाव, "कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता विभाग" असे नामकरण करण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**कौशल्य विकास व उद्योजकता विभाग**
**शासन निर्णय क्र. कौविउ-२०२०/प्र.क्र.९९/प्रशा-१**
मंत्रालय (मुख्य), मुंबई-४०० ०३२.
दिनांक : २९ सप्टेंबर, २०२०.

<u>वाचा:-</u> १) सामान्य प्रशासन विभाग, शा.नि.क्र.एईओ-१०१५/प्र.क्र.६/२०१५/१०, दि.१५.१.२०१५.

२) कौ.वि.व उ.विभाग, शा.नि. क्र.कौविउ-२०१५/प्र.क्र.१९०/प्रशा-१, दि.२.९.२०१५.

३) सा.प्र. विभाग, शासन परिपत्रक क्र.शाकानि-२०१९/प्र.क्र.६५/१८(रवका), दि.६.८.२०१९.

<u>प्रस्तावना:-</u>

केंद्र शासनाच्या धर्तीवर, राज्यातील सन १९९७ मध्ये निर्माण करण्यात आलेल्या "रोजगार व स्वंयरोजगार" या विभागाचे नामकरण, सामान्य प्रशासन विभागाच्या दि. १५ जानेवारी, २०१५ च्या शासन निर्णयान्वये, "कौशल्य विकास व उद्योजकता" असे करण्यात आले आहे. या विभागात दि.२ सप्टेंबर,२०१५ च्या शासन निर्णयान्वये व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, संचालनालयाच्या अधिनस्त कार्यालये, संस्था तसेच त्यांच्याशी संबंधित उच्च व तंत्र शिक्षण विभागातील संबंधित कार्यासने (कर्मचाऱ्यांसह) यांचा समावेश करण्यात आला आहे.

रोजगार व स्वंयरोजगार या विभागाचे नामकरण कौशल्य विकास व उद्योजकता असे करण्यात आले आहे. तथापि, या नामकरणामध्ये "रोजगार" या शब्दाचा उल्लेख नाही. त्यामुळे रोजगार व स्वयंरोजगार या बाबींशी संबंधित विभाग कोणता, याबाबत जनतेमध्ये संभ्रम निर्माण होतो. रोजगार व स्वंयरोजगाराशी संबंधित विभाग कोणता, ही बाब स्पष्ट होण्यासाठी विभागाच्या नावात रोजगार या शब्दाची भर घालून विभागाचे नाव, "कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता विभाग" असे नामकरण करण्याचे प्रस्तावित होते. यास मंत्रिमंडळाने दि. ८ जुलै, २०२० च्या बैठकीत मान्यता दिलेली आहे. सदर निर्णयास अनुसरुन विभागाच्या नावातील बदलाबाबतचा शासन निर्णय निर्गमित करण्याची बाब विचाराधीन होती.

**शासन निर्णय:-**

राज्य मंत्रिमंडळाच्या बुधवार दि.८ जुलै, २०२० रोजीच्या बैठकीत घेतलेल्या निर्णयास अनुसरुन, "कौशल्य विकास व उद्योजकता विभाग" या विभागाच्या नावात रोजगार या शब्दाची भर घालून विभागाचे नाव, "कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता विभाग" असे करण्यात येत आहे.

सामान्य प्रशासन विभागाच्या दिनाक ६ ऑगस्ट, २०१९ च्या परिपत्रकानुसार, महाराष्ट्र शासन कार्यनियमावलीच्या पहिल्या अनुसूचीमध्ये बदल करण्याच्या अनुषंगाने सामान्य प्रशासन विभागाने अधिसूचना काढण्याची/ प्रसिध्द करण्याची कार्यवाही करावी.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक २०२००९२९१७१६२०१४०३ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Santosh Vithal Rokade

Digitally signed by Santosh Vithal Rokade
DN: c=IN, o=Skill Development and Entrepreneurship Department, Government Of Maharashtra, ou=eOffice, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=ca5751ffedbb005fdff34ab6ac1f8319d061483d7d35e20f744e251360f7920a, serialNumber=ecf4a9abe84c70de989c3669424c12b6cadcb583d500fe489ce8727916e0bbee, cn=Santosh Vithal Rokade
Date: 2020.09.29 17:21:53 +05'30'

**( संतोष रोकडे )**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति.**

१. मा.राज्यपालांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई
२. मा.मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई
३. मा.मंत्री (कौशल्य विकास व उद्योजकता विभाग) यांचे खाजगी सचिव
४. मा.राज्यमंत्री (कौशल्य विकास व उद्योजकता विभाग) यांचे खाजगी सचिव
५. मुख्य सचिव यांचे उप सचिव, मंत्रालय, मुंबई
६. अपर मुख्य सचिव (सेवा)/सचिव (र.व का.), सामान्य प्रशासन विभाग
७. सचिव, कौशल्य विकास व उद्योजकता विभाग मंत्रालय, मुंबई
८. आयुक्त, कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता आयुक्तालय, नवी मुंबई.
९. संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, मुंबई.
१०.मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य नाविन्यता सोसायटी, मुंबई
११.मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास सोसायटी, मुंबई
१२.व्यवस्थापकीय संचालक, अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळ, मुंबई.
१३.सर्व विभागीय आयुक्त,
१४.सर्व जिल्हाधिकारी
१५.सर्व प्रादेशिक सहसंचालक/ उपायुक्त,
१६.सर्व जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी/ सहायक आयुक्त
१७.सर्व प्राचार्य, शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था
१८. सर्व मुख्याध्यापक, शासकीय तंत्र शाळा
१९.सर्व सह सचिव / उप सचिव/ अवर सचिव/ कक्ष अधिकारी, कौशल्य विकास व उद्योजकता विभाग
२०.निवडनस्ती (प्रशा-१).